
गज्जो विभागो - पठमो पाठो ।

# तिरतन गुणानि ।

सम्बोधिप्राप्तीनंतर तथागतांनी 'चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा भिक्खू-सङ्घाला फार मोठा संदेश देत सतत ४५ वर्षे विचरण केले. पालि तिपिटकातील 'विनयपिटक' या ग्रंथामध्ये याचा उल्लेख प्राप्त होतो.

तथागतांनी तत्कालीन भारतीय समाजालाच नव्हे तर संपूर्ण जगाला आपल्या बौद्धिक, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक तसेच सांस्कृतिक नीतिमूल्यांद्वारे 'नत्थि अतीता च, नत्थि अनागतो च' अशी फार मोठी देणगी दिलेली आहे. बुद्धकालीन श्रमण-ब्राह्मण-परिव्राजकांमध्ये विविध विषयांवर परस्परांमध्ये चर्चा होत असताना त्यांचे जेव्हा एकमत होत नव्हते, त्यांच्यामध्ये काही शंका उपस्थित होत असत अशावेळी आपल्या शंका-निरसनासाठी ते तथागताकडे येत होते. तत्पूर्वी ते बुद्ध, धम्म आणि सङ्घ या तीन रत्नांच्या कल्याणकीर्तिची प्रशंसा करीत असत, त्याचेच वर्णन या पाठामध्ये आलेले आहे.



इतिपि सो भगवा अरहं, सम्मासम्बुद्धो, विज्जा-चरणसम्पन्नो, सुगतो, लोकविदू, अनुत्तरो, पुरिसदम्म-सारथि, सत्था देवमनुस्सानं बुद्धो भगवा' ति ।

स्वाक्खातो भगवता धम्मो सन्दिट्ठिको अकालिको एहिपस्सिको ओपनेय्यिको पच्चत्तं वेदितब्बो विञ्ञूही' ति ।

सुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, उजुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, ञायप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, सामीचिप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो, यदिदं चत्तारि पुरिसयुगानि, अट्ठ पुरिसपुग्गला, एस भगवतो सावकसङ्घो, आहुनेय्यो, पाहुनेय्यो, दक्खिणेय्यो, अञ्जलिकरणियो अनुत्तरं पुञ्ञक्खेत्तं लोकस्सा' ति ।

(*Dr. Babasaheb Ambedkar - Writing and Speeches, Vol. 16 - आवश्यक बदल करून*)

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**भगवा** (पुं.) - तृष्णामुक्त, भगवन्त

**सम्मासम्बुद्धो** (पुं.) - (सम्मा+सम्बुद्ध) संपूर्ण ज्ञानी

**सुगतो** (वि.) - चांगल्या गतीला प्राप्त झालेला

**लोकविद्** (वि.) - (लोक + विद्) बुद्धासंदर्भात संबोधिलेले गुणवाचक विशेषण, विश्वाचे स्वरुप जाणणारा

**सत्था** (पुं. प.वि.) - शास्ता, तथागत

**बुद्धो** (वि.) - (बुद्ध) ज्ञानी, बुद्धिमान

**अरहं** (पुं.) - अर्हत, जीवनमुक्त

**विज्जाचरणसम्पन्नो** (नपुं.) - (विज्ज+आचरण) विद्या आणि आचरणाने युक्त

**अनुत्तर** (नपुं.) - सर्वोत्तम

**पुरिसदम्मसारथी** (अकुशल मार्गगामी) - पुरुषांचे दमन करणारा सारथी

**स्वाक्खात** (वि.) - (सु-आख्यात) चांगल्याप्रकारे व्याख्या केलेला

**धम्मो** (पुं.) - धम्म, सिद्धान्त, स्वभाव, सत्य, सदाचार

**अकालिको** - (अ+कालिक) - तात्काळ, वेळीच

**एहिपस्सिक** - (वि.) - जो धम्म सर्वांना सूचित करतो की, या आणि परीक्षा करून पहा, या अनुभवा

**वेदितब्बो** (विद्) - जाणणे, जाणण्यायोग्य

**सावकसङ्घ** (पुं.) - शिष्यांचा समूह

**उजु** (वि.) - सरळ

**सामीचि-पटिपन्न** (वि.) - उचित मार्गावर आरूढ

**चत्तारि** - चार

**युग** (नपुं.) - जोडी

**आहुनेय्यो** (वि.) - भेट देण्यायोग्य

**दक्खिणेय्यो** (वि.) - दान देण्यायोग्य

**सन्दिट्ठिको -सन्दिट्ठिक** - (वि.) दृष्टीस पडणारा, दिसून येणारा

**ओपनेय्यिको** (वि.) - (उपनय + इक) जवळ नेणारा

**पच्चत्तं** (क्रि.वि.) - पृथक-पृथक, व्यक्तिगत

**विञ्ञू** (वि.) - बुद्धिमान, विद्वान, ज्ञाता

**सुप्पटिपन्न** (वि.) - सुमार्गावर आरूढ, सुमार्गावर जाणारा

**ञायप्पटिपन्न** (वि.) - न्याय्य मार्गाला नेणारा, चांगल्या मार्गाला नेणारा

**यदिदं** (वि.) - (यद्+इदम) - म्हणजे

**पुग्गल** (पुं.) - पुद्‌गल, व्यक्ती

**अट्ठ** (वि.) - आठ

**पाहुनेय्यो** (वि.) - आदरातिथ्य करण्यायोग्य

**अञ्जलिकरणियो** (वि.) - हात जोडण्यायोग्य

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) ‘बुद्ध’ म्हणजे काय ?

(२) ‘धम्म’ म्हणजे काय ?

(३) ‘सङ्घ’ म्हणजे काय ?

**२. खालील प्रश्नांची पालिमध्ये उत्तरे लिहा.**

(१) बुद्धस्स धम्मो किदिसो होति ?

(२) बुद्धस्स सावकसङ्घो किदिसो होति ?

### टिपणे

- बुद्ध, धम्म आणि सङ्घ या शब्दांची ओळख व त्यांचे गुणकार्य सांगणे.
- बुद्ध, धम्म आणि सङ्घ हे ‘तिरतन’ सर्व रत्नांपेक्षा मौल्यवान कसे आहेत ते जाणणे.

★★★